


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २१८, रविवार १२ मे २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

## नीलेश भाऊंच्या पुढे मी ढाल म्हणून उभी राहील !

### ■ सुप्रिया सुळे यांचे अजित पवार यांना प्रत्युत्तर ■ ढवळपुरी येथे प्रचार सभा

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेरला झालेल्या सभेत नीलेश भाऊंना दमदाटी करण्यात आली. सुसंस्कृत महाराष्ट्रात दमदाटी चालणार नाही असे सांगनाच हे खपवून घेतले जाणार नाही. नीलेश भाऊंच्या पुढे मी ढाल म्हणून उभी राहिल असा इशारा खा. सुप्रिया सुळे यांनी अजित पवार यांचे नाव न घेता दिला.**

महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्या प्रचारार्थ आयोजित करण्यात आलेल्या सभेत सुळे बोलत होत्या. यावेळी सक्षणा सलगर, संपत म्हस्के, किसनराव लोटके, जयंत वाघ, राजेंद्र फाळके, संभाजी रोहोकले, सुवर्णा धाडगे यांच्यासह मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

यावेळी बोलताना सुळे म्हणाल्या, कसली दमदाटी ? दमदाटीला कोणी घाबरत नाही. आजच्या सभेत त्यांचे भाषण सुरू होते एक जण म्हणाला की रामकृष्ण हरी वाजवा तुतारी ! हेच समाजमन आहे. आदरयुक्त भिती असलीच पाहिजे. जे वयाने मोठे आहेत त्यांचा सन्मान केलाच पाहिजे. हे आमचे संस्कार आहेत. पण दमदाटी सुसंस्कृत महाराष्ट्रात चालणार नाही,

आम्ही खपवून घेणार नाही. जे नीलेश लंके यांना दम देत आहेत ना त्यांना मला नम्रपणे सांगायचे आहे की दमदाटी तुमच्या घरात करा. ही लोकशाही आहे. लोकशाहीमध्ये दमदाटीचा अधिकार कुणालाही नाही. प्रेमाने बोला आदर सत्कार करू. काल ऐकले की आरे ला कारे म्हणावंच लागतं. नीलेश भाउला कोणी दमदाटी केली ना ढाल म्हणून सुप्रिया सुळे त्याच्या समोर उभी राहिल असा इशारा सुळे यांनी दिला.

सुळे म्हणाल्या, कांद्याला भाव मिळावा यासाठी मी आणि डॉ. अमोल कोल्हे संसदेत भांडलो. त्यामुळे आमचे निलंबन करण्याचे पाप भारतीय जनता पक्षाने केले. तुमचे खासदार डॉ. सुजय विखे यांनी कांद्याला हमीभाव मिळावा म्हणून आंदोलन केले का ? भाजपा सरकारने एका उद्योगपतीचे १० हजार कोटी रूपये माफ केले शेतकऱ्याकडे मात्र दुर्लक्ष केले. भविष्यात आपलेच सरकार सत्तेत येणार आहे. पारनेरमधून आमची मागणी ही राहील की १ हजार कोटी रूपये उपलब्ध करून शेतकऱ्याची सरकट कर्जमाफी करावी. कांद्याची निर्यात तात्काळ सुरू करण्यात करावी. एकीकडे पाकिस्तानचा कांदा जगात चालला आहे तर दुसरीकडे भारतातला कांदा सडतो आहे याला जबाबदार कोण असा सवाल सुळे यांनी केला.



■ ढवळपुरी येथे आ. नीलेश लंके यांच्या प्रचारार्थ झालेल्या सभेमध्ये खा. सुप्रिया सुळे यांनी मार्गदर्शन केले.

### त्यांच्या हिमतीला दाद दिली पाहिजे

आपण त्यांच्यासोबत गेलो नाही हे चांगले झाले कारण आज कोणत्या तोंडाने मते मागितली असती ? कांद्याला भाव नाही या लोकांनी आपल्याला कांदे फेकून मारले असते. जे आज तुमच्याकडे मते मागत आहेत त्यांच्या हिमतीला दाद दिली पाहिजे असे सांगत सुप्रिया सुळे यांनी खा.डॉ. सुजय विखे यांच्यावर नाव न घेता टिकास्त्र सोडले.

### लोकसभेत लंके फॅक्टर गाजणार

घरात बसणार फेक डॉक्टर आणि लोकसभेत गाजणार लंके फॅक्टर ! असे सांगत सेनापती बापट यांच्यानंतर या तालुक्यातून स्वाभिमानाची तुतारी फुंकण्यासाठी नीलेश लंके हा पठ्ठ्या तयार असल्याचे सक्षणा सलगर यांनी सांगितले.

### पोराचं कर्तुत्व पहावं की सासऱ्याची संपत्ती?

ज्यावेळी सुप्रियाताई संसदेत बोलत होत्या त्यावेळी सुजय विखे कुठे लपून बसले होते ? त्यांना किती वेळा संसदरत्न पुरस्कार मिळाला ? खासदार म्हणून गावागावांमध्ये ते किती वेळा आले, त्यांनी किती प्रश्न सोडविले ? केवळ स्व. बाळासाहेब विखे यांचा वारसा सांगायचा, सहकार महर्षींचा नातू असल्याचे सांगायचे. आणि मोदींकडे पाहून मतदान करा असे सांगितले जातेय. पोरगी देताना सासऱ्याची संपत्ती पाहून दिली जातेय का ? पोराचं कर्तुत्व पाहता की नाही ? हे असे झालंय पोराकडं पाहूच नका, सासऱ्याकडे पहा ! असे चालेल का ? उमेदवाराची गुणवत्ता काय ? विखे नाव सोडले तर पाच माणसे ओळखणार नाहीत. कोरोनाचा डॉक्टर म्हणून नीलेश लंके यांना अवघा महाराष्ट्र ओळखत असल्याचे सक्षणा सलगर म्हणाल्या.

### तालुक्यातून सर्वाधिक मताधिक्य हवे

आपण या निवडणूकीत विजयी होणार ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे. आता तालुक्या-तालुक्यांमध्ये मताधिक्क्याची स्पर्धा लागली आहे. असे असताना पारनेर तालुका मागे राहिला तर त्याची सल माझ्या मनात राहणार आहे. कारण जो तालुका सर्वाधिक मताधिक्य देणार त्या तालुक्यात विजयी सभा घेण्यात येणार आहे. त्यामुळे तालुक्याचे मताधिक्य सर्वाधिक राहिल यासाठी प्रत्येकाने जीवाचे रान करावे.

नीलेश लंके उमेदवार

### धनगर बांधवाला कुत्र्यासारखं मारलं

राधाकृष्ण विखे मोठे नेते आहेत. सोलापूर येथे धनगर बांधव भेटण्यासाठी आले होते. आमच्या धनगर बांधवाने त्यांच्या डोक्यावर भंडारा टाकला तर त्याला कुत्र्यासारखं मारण्यात आलं. त्याचं उत्तर १३ तारखेला मतदानातून कळेल.

### कोण गद्दार, कोण खुद्दार जनता ठरवेल

अजितदादांचं भाषण ऐकून मला दु:ख झाले. याला पाडतो, त्याला पाडतो. त्यांनी पाडापाडीचे कॉन्ट्रॅक्ट घेतलंय काय ? दादा हे बरोबर नाही. मला तुमचा आदर होता, आदर आहे. परंतू तुम्ही जी भाषा वापरताय. अमोल कोल्हेंना पाडतो, अशोक पवारांना म्हणाले तुझी आवकात नाही, हा भाषा आहे का ? कोणी लाख गरीब असो कोणी कोणाची औकात काढायची नसते. तु तुझ्या घरी सोन्याहून पिवळा, मी माझ्या घरी कोळश्याहून काळा. महाराष्ट्राच्या जनतेने ठरविले आहे, गद्दार कोण आणि खुद्दार कोण ते. पवार साहेबांसारख्या ८४ वर्षांच्या योध्याला नामोहरम करण्यासाठी तुम्ही अमित शहा यांच्या टोळीमध्ये सहभागी झाला आहात असा आरोप सक्षणा सलगर यांनी केला.

### अब प्रजाका बेटा राजा बनेगा !

चौंडी येथे धनगर बांधव उपोषणाला बसले होते ऑगस्ट २०२४ मध्ये. १५ दिवस उपोषण सुरू होते. खासदार विखे उपोषणकर्त्यांकडे एकदाही गेले नाहीत. ती माणसं नाहीत का ? ती मेंढरं आहेत का ? आम्ही मेंढरं पाळणारी माणसं आहोत. मला त्याचा अभिमान आहे. तुम्ही का विचारण्यासाठी आले नाहीत. आम्ही माणसं नाहीत का ? अब राजा का बेटा राजा नही बनेगा प्रजाका बेटा राजा बनेगा.

सक्षणा सलगर, प्रदेशाध्यक्ष
राष्ट्रवादी युवती काँग्रेस

### तालुक्याच्या स्वाभिमानासाठी ढवळपुरीकर एकत्र

ढवळपुरी ग्रामपंचायतीच्या निवडणूकीत एकमेकांविरोधात लढलेले डॉ. राजेश भनगडे, भागानाना गावडे, सुखदेव चितळकर हे लोकसभा निवडणूकीच्या निमित्ताने मतभेद विसरून तालुक्याच्या स्वाभिमानासाठी एकत्र आले. ढवळपुरीचा हा विचार प्रत्येक गावागावात पोहचला पाहिजे. तालुक्यात राष्ट्रवादी व शिवसेना अशी विचारसरणी आहे. या दोन्ही विचारसरणीही महाविकास आघाडीच्या माध्यमातून या निवडणूकीत एकत्र आलेल्या असल्याने आपल्या तालुक्याचे मताधिक्य एक लाखांपेक्षा अधिक असले पाहिजे अशी अपेक्षा लंके यांनी व्यक्त केली.

### देवदूताला मतदान करण्याची संधी

कोरोना संकटात खानदेशातील अनेक रूग्ण भाळवणीच्या शरदचंद्र पवार आरोग्य मंदिराकडे येत होते. चौकशी केली असता त्या लोकांनी सांगितले की तिथे एक देवदूत आहेत. त्यानंतर आपणही या सेंटरला भेट दिली असता नीलेश लंके हे स्वत: रूग्णांची सेवा करत होते. त्यावेळी वाटले आमदार असावा, नेता असावा तर नीलेश लंके यांच्यासारखा. अशा देवदूताला लोकसभेत पाठविण्याची संधी आपणास मिळाली आहे. त्यांना भरभरून मतदान करावे.

शुभांगी पाटील शिवसेना उपनेत्या

## लंकेंविरोधात पंतप्रधानांना सभा का घ्यावी लागली?

### ■ रोहित पाटील यांचा सवाल ■ बोधेगांव येथे नीलेश लंके यांच्या प्रचाराची सांगता सभा



बोधेगांव, पाथर्डी : प्रतिनिधी

**काही दिवसांपूर्वी कळाले की अनेक नेत्यांच्या सभा नगर दक्षिणमध्ये होत आहेत. नीलेश लंके साधा सुधा माणूस असता तर त्यांच्यासाठी देशाच्या प्रधानमंत्र्यांना नगर दक्षिणमध्ये येण्याची काय गरज भासली ? याचे उत्तर भाजपाचे उमेदवार डॉ. सुजय विखे यांनी देण्याची आवश्यकता असल्याचे रोहित आर.आर.पाटील यांनी सांगितले.**

महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्या पाथर्डी व बोधेगाव येथे पार पडलेल्या प्रचाराच्या सांगता समारंभात रोहित पाटील हे बोलत होते. सांगता सभेस मोठया संख्येने नागरीक उपस्थित होते. उमेदवार नीलेश लंके, आ. रोहित पवार, प्रताप ढाकणे नितीन काकडे, राजाभाऊ दौंड, रामदास गोल्हार, यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

यावेळी बोलताना पाटील म्हणाले, या निवडणूकीच्या माध्यमातून महाराष्ट्राची अस्मिता, प्रतिष्ठा जपण्याची संधी आपल्या सर्वांना आली आहे. यशवंतराव चव्हाणांपासून वसंतराव नाईकांपर्यंत या महाराष्ट्रावर काँग्रेस व घटकपक्षांनी उपकार केले आहेत ते आपण विसरणार का ? शरद पवार यांनी दिल्लीमध्ये पत वाढवायची असेल तर महाराष्ट्रातून जास्तीत जास्त खासदार त्यांच्या पाठीशी उभे करण्याचे काम केले पाहिजे असे आवाहन पाटील यांनी केले. पाटील पुढे म्हणाले, केदारेश्वर कारखाना उभा करण्यासाठी स्व.बबनराव ढाकणे यांना शरद पवार यांनी मार्गदर्शन केले, मदत केली. इथल्या अनेक प्रश्नांना न्याय देण्याचे काम पवार यांनी केले असून त्यांच्या माध्यमातून या भागात शास्वत काम उभे राहिले आहे. या शास्वत कामाला गती द्यायची असेल तर पवार यांच्याशिवाय पर्याय नाही हे दिल्लीला ठणकाऊन सांगण्याची वेळ आला आली आहे.

### रात्री २ वाजता लंके यांनी अडचण दूर केली

नीलेश लंके सर्वसामान्यांचा उमेदवार आहे. एकदा रात्री २ वाजता मी त्यांना फोन केला. त्यांनी इतक्या रात्री फोन घेतला. आमच्याकडचा ट्रान्सपोर्ट व्यवसायीक या भागात आला होता. त्याला अडचण आली म्हणून मी लंके यांना मदत करण्याची विनंती केली. रात्री अडीच वाजता लंके यांचा फोन आला की त्या व्यवसायीकाची अडचण दुर झाली असून तो इथून रवाना झाला आहे. असे त्यांचे काम आहे असे पाटील म्हणाले.

### हिणवणारांना मतदानातून उत्तर द्या

जी माणसं गावगाडयातल्या माणसाला कमी लेखतात, हिणवताहेत त्यांना या लोकसभेच्या निवडणूकीच्या मतदानातून उत्तर द्यायचे आहे. गावगाडयाचा माणूस दिल्लीच्या तख्खावर बसवून दाखवायचा हा निर्धार नगर दक्षिणच्या मतदारांनी करण्याची आवष्यकता असल्याचे पाटील यांनी सांगितले.

### कोरोना संकटात गावगाडयातील माणसाची ओळख

नीलेश लंके यांच्यासारखा एक चांगला उमेदवार नगर दक्षिणसाठी दिला आहे. नीलेश लंके साधा माणूस आहे. अनेक वर्षे आम्ही त्यांना पाहतो आहोत. कोरोनाच्या काळात नीलेश लंके हा गावगाडयातला माणूस आहे ही ओळख संपूर्ण महाराष्ट्राला पटली. गावगाडयातला माणूस काय काम करू शकतो ? क्रांतीकारक निर्णय घेऊ शकतो. बंड करून स्वत:च्या हिमतीवर निवडूण येऊ शकतो. हे लंके यांनी गेल्या विधानसभेला दाखवून दिले असल्याचे पाटील यांनी सांगितले.

### फडणवीसांचा विखेंच्या कर्तुत्वावर विश्वास नाही का ?

देवेंद्र फडणवीस भाषणाला उभे राहिल्यावर सांगतात की इथल्या स्थानिक उमेदवाराला पाहू नका. पंतप्रधान मोदींना करायचे आहे, त्यांच्याकडे पाहून मत द्या. याचा एकच अर्थ होतोय की डाळ साखरेवर त्यांच्या विश्वास नसावा किंवा इथल्या स्थानिक उमेदवाराच्या कर्तुत्वावर विश्वास नसावा असा टोला पाटील यांनी लगावला.

### मालकाकडे पाहून कोणी बैलाची खरेदी करते का ?

पाथर्डीला बैलांचा मोठा बाजार भरतो. इथली अनेक लोकं त्या बाजारात जाऊन बैल खरेदी विक्री करत असतील. मालकाकडे पाहून बैल खरेदी केल्याचे एक तरी उदाहरण महाराष्ट्रामध्ये आहे का ? आमचे प्रश्न सोडविण्यासाठी दिल्लीतून मोदी इकडे येणार आहेत का ?

रोहित पवार युवा नेते, राष्ट्रवादी काँग्रेस

### तर त्यांनी बोधेगांवलाही सभा घेतली असती !

निवडणूक आयोगाची यांच्यावर मेहरबाणीच म्हणावी लागेल. प्रत्येक जिल्हयात जाऊन त्यांना सभा घ्याव्या लागतात. आणखी दोन चार टप्पे निवडणूक आयोगाने वाढविले असते तर बोधेगांवमध्ये पंतप्रधानांची सभा घेण्यासाठी त्यांनी मागे पुढे पाहिले नसते. इतकी दयनीय स्थिती यांची झाली असल्याचे पाटील म्हणाले.

### ते तुमच्याशी प्रामाणिक राहतील का ?

हेलीकॉप्टरमधून फिरणारा खासदार हवा की जमिनीवर राहून सर्वसामान्यांचे प्रश्न मार्गी लावणारा खासदार पाहिजे हे ठरविण्याची जबाबदार मतदारांची आहे. लोकांमध्ये जाऊन काम करणारा, महाराष्ट्रामध्ये ओळख असणारा नेता नीलेश लंके आहे. नीलेश लंके यांचे वडील पालकमंत्री असते तर त्यांनी महाराष्ट्र नाही तर देश हादरवून टाकला असता. काँग्रेसचे उपकार विसरून ज्यांनी सत्तेच्या मोहापायी भाजपामध्ये प्रवेश केला ते तुमच्या आमच्या बरोबर प्रामाणिक राहू शकत नाहीत असे पाटील म्हणाले.

### विरोधी उमेदवाराची पाकीटे लंके यांना !

लंके यांच्या विरोधातील एका उमेदवाराने ग्रामपंचायत, सोसायटी पदाधिकारी व सदस्यांना वितरीत केलेल्या पाकीटांपैकी काही पदाधिकारी, सदस्यांनी त्यांना मिळालेली पाकीटे नीलेश लंके यांच्याकडे सूपूर्द केली ! त्याची चांगलीच चर्चा सभास्थळी रंगली होती.

### म्हणून मी गुंड !

मी विखे-पिता पुत्रांचे ऐकत नाही. त्यांच्याशी राजकीय तडजोड करत नाही त्यामुळे माझ्यावर गुंडगिरीचा आरोप केला जातोय. मी कधी गुंडगिरी केली ? कोणत्या गोरगरीबावर अन्याय केला ? एखाद्या गरीबावर, सर्वसामान्य व्यक्तीवर अन्याय झाला तर त्याच्याशी दोन हात करण्याची आपली तयारी असते. आपला तालुका स्वाभिमानी आहे. मोठयाला खेटण्याची आपणास सवय आहे. समोरच्या पहिलवानाला दोन ते अडीच लाख मतांनी मी पराभूत करणार असल्याचा विश्वास लंके यांनी व्यक्त केला.

### सर्वाधिक मताधिक्य द्या

कोरोना काळात जीवाची पर्वा न करता नीलेश लंके यांनी काम केले. लोकसभा निवडणूकीच्या निमित्ताने आपल्या तालुक्याला मोठी संधी लाभली असून या संधीचे सोने करायचे आहे. आपल्या तालुक्याच्या स्वाभिमानाचा प्रश्न आहे. गावपातळीवरील वाद दूर ठेवा गावागावांतून लंके यांना सर्वाधिक मताधिक्य द्यावे.

प्रियंका खिलारी
शिवसेना महिला आघाडी तालुकाप्रमुख

### आपलं ते आपलंच पोरगं

नीलेश लंके यांनी कधीही गरीब-श्रीमंत असा भेदभाव केला नाही. प्रत्येक माणूस माझा आहे ही भावना ठेऊन त्यांनी काम केले आहे. दुसऱ्याची पोरं किती दिवस अंगाखांद्यावर खेळविणार ? दुसऱ्याचं पोरगं ते दुसऱ्याचंच असते. कधीतरी ते द्यावंच लागतं. आपलं ते आपलंचे असतं. पाणी पाजायला आपलंच पोरगं लागतं. हक्काचं पोरगं म्हणजे नीलेश लंके असून त्यांना मोठया मताधिक्क्याने संसदेत पाठवायचे आहे.

सुवर्णा धाडगे
राष्ट्रवादी महिला आघाडी तालुकाध्यक्ष




Shree Datta Bahuuddeshiya Sanstha's

Saint Vivekanand Public School

A/P-Jamgaon, Tal-Parner, Dist-Ahmednagar

PH-9860815843, 9420812001

REQUIRED TEACHERS 2024-2025

We are looking for passionate experienced /fresher, innovative and qualified teacher with good communication skill and fluency in English for following classes.

| Sr.No. | Subject | Qualification | No.of Post |
|---|---|---|---|
| 1 | Pre-Primary | H.S.C./Graduate/D.Ted | 4 |
| 2 | Primary | H.S.C/Graduate/D.Ted /B.Ed | 3 |
| 3 | Math's | B.sc/M.sc/B.ed | 2 |
| 4 | Science | B.sc/M.sc/B.ed | 2 |
| 5 | STT | B.A./M.A.B.ed/(His/Geo) | 1 |
| 6 | English | B.A./M.A.B.Ed | 3 |
| 7 | Marathi | B.A/M.A.B.Ed | 2 |
| 8 | Hindi | B.A/M.A.B.Ed | 1 |
| 9 | Art Teacher (Drawing) | Diploma ATD | 1 |
| 10 | Administrative Staff | Compuer knowledge | 1 |

Walk-in Interview with all document on Thursday 25 April 2024 10.00 AM to 3.PM at Above Address

Note -

- Salary commensurate based on skill, qualification and Experience.
- Training will be provided to Fresher candidate who are Passionate about Education



# प्रगतीमंत्र

## कोण म्हणे बेरोजगारी?



**सरकारी रोजगार पोर्टल नॅशनल करिअर सर्व्हिसच्या (एनसीएस) अहवालावरून एक रंजक माहिती समोर आली आहे. मार्चअखेरीस संपलेल्या आर्थिक वर्षात अर्जदारांपेक्षा रोजगाराची संख्या अधिक असल्याचे समोर आले आहे. एनसीएसच्या आकडेवारीनुसार पोर्टलवर १ कोटी ९ लाख २४ हजार १६१ जागा उपलब्ध होत्या, तर अर्जदारांची संख्या ८७ लाख २७ हजार ९०० होती.**

एनसीएसच्या अहवालानुसार आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये पोर्टलवर ३४ लाख ८१ हजार ९४४ जागांची उपलब्धता होती, तर अर्ज करणाऱ्यांची संख्या ५७ लाख २० हजार ७४८ होती. मात्र, २०२३-२४ मध्ये रोजगाराची संख्या २१४ टक्क्यांनी वाढून १ कोटी ९ लाख २४ हजार १६१वर गेली. तर, त्या तुलनेत अवघे ५३ टक्के अर्ज आले. अगदी दहावी पास आणि त्याहून कमी शिक्षण असलेल्या, बारावी पास, आयटीआय, डिप्लोमा (पदविका), पदवीधर, पदव्युत्तर पदवी, पीएचडी, पीजी डिप्लोमाधारकांसाठी रोजगार मुबलक प्रमाणात उपलब्ध होते. वित्त आणि विमा क्षेत्रात सर्वाधिक ४६ लाख ६८ हजार ८४५ जागा होत्या. त्यात गेल्या वर्षीपेक्षा त्यात १३४ टक्क्यांनी वाढ झाली.

### बांधकाम क्षेत्रात त्सुनामी...

आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये रोजगारवाढीचा वेग हा बांधकाम क्षेत्रात राहिला आहे. आर्थिक वर्ष २१-२२-२३ मध्ये बांधकाम क्षेत्रात ९,३९६ रोजगार संधींची नोंद पोर्टलवर होती. त्यात २०२३-२४ मध्ये ११ लाख ७५ हजार ९०० पर्यंत वाढ झाली. ही टक्केवारी १२,४१५ टक्के इतकी महाप्रचंड आहे.

### आयटीतही संधीच संधी...

आयटी कंपन्यांसाठी गत वर्ष कामगारकपातीचे ठरल्याचे संबंधित कंपन्यांनी जाहीर केलेल्या अहवालावरून समोर आले आहे. मात्र, एनसीएसच्या नोंदीनुसार २०२२-२३ मध्ये आयटी अँड कम्युनिकेशन या श्रेणीसाठी (सॉफ्टवेअर इंजिनिअरसह) १ लाख ९३ हजार २७९ जागा होत्या. त्यात २०२३-२४मध्ये ४ लाख ९३ हजार ७५० वाढ झाली.

## सीयूईटी परीक्षा १५ मेपासून

**नॅशनल टेस्टिंग एजन्सी अर्थात एनटीएव्दारे पदवीच्या विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या कॉमन युनिव्हर्सिटी प्रवेश परीक्षेचे (सीयूईटी यूजी परीक्षा) सविस्तर वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. एनटीएने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार १५ ते २४ मे या कालावधीत देशभरातील ३५४ आणि भारताबाहेरील २६ शहरांमध्ये परीक्षा घेतली जाणार आहे. ही परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेतली जाणार आहे.**

विद्यार्थ्यांना देशभरातील केंद्रीय विद्यापीठे, राज्य विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, खासगी विद्यापीठांमध्ये बारावीनंतरच्या पदवी अभ्यासक्रमाला प्रवेश घेणे सोयीचे होण्यासाठी सीयूईटी-यूजी ही संयुक्त प्रवेश परीक्षा घेतली जाते. या परीक्षेच्या आयोजनाची जबाबदारी एनटीएकडे सोपविण्यात आली आहे. एनटीए जवळपास ६३ पेपर घेणार आहे. यामध्ये काही पेपरचा कालावधी ४५ मिनिटांचा, तर काही पेपरचा कालावधी ६० मिनिटांचा राहणार आहे. परीक्षा दोन सत्रांमध्ये चार भागांमध्ये होणार आहे. पहिले सत्र सकाळी १० ते ११ आणि १२.१५ ते १ या वेळेत होणार आहे. दुसरे सत्र दुपारी ३ ते ३.४५ आणि ५ ते ६ वाजेपर्यंत असेल. एनटीए घेत असलेल्या सीयूईटी यूजी परीक्षेसाठी देशभरातील तब्बल १३ लाख ४८ हजार विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेली आहे. विषयनिहाय आणि माध्यमनिहाय संबंधित परीक्षा घेण्यात येणार असून, त्याची सविस्तर माहिती एनटीएच्या संकेतस्थळावर देण्यात आली आहे.



## यूजीसी नेट १६ जूनला

**राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणातर्फे विद्यापीठ अनुदान आयोग राष्ट्रीय पात्रता परीक्षेसाठी (यूजीसी नेट) अर्ज नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. त्यानुसार १० मेपर्यंत अर्ज करता येणार आहे. १३ ते १५ मेदरम्यान अर्जात दुरुस्ती करण्याची संधी देण्यात येणार असून, परीक्षा १६ जूनला घेतली जाणार आहे. एनटीएने या संदर्भातील परिपत्रक प्रसिद्ध केले आहे.**


डिसेंबर आणि जून अशी वर्षातून दोन वेळा यूजीसी नेट ही परीक्षा घेतली जाते. यूजीसीने जूनमध्ये होणाऱ्या परीक्षेपासून काही महत्त्वाचे बदल केले आहेत. त्यानुसार नेट परीक्षेद्वारे कनिष्ठ संशोधन पाठ्यवृत्तीसह सहायक प्राध्यापक पदासाठीची पात्रता, सहायक प्राध्यापक पदासह पीएच.डी. प्रवेशासाठीची पात्रता, केवळ पीएच.डी. साठी प्रवेश दिला जाणार आहे. तसेच, चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमाच्या शेवटच्या वर्षाच्या, शेवटच्या सत्राच्या विद्यार्थ्यांनाही थेट पीएच.डी.ला प्रवेश देण्यासाठी नेट परीक्षा देता येणार आहे. त्यामुळे जूनमध्ये होणारी परीक्षा अधिक महत्त्वाची ठरणार आहे. अधिकृत सूचनेनुसार, १६ जूनला होणारी परीक्षा ८३ विषयांसाठी घेतली जाणार आहे. ही परीक्षा एक किंवा अधिक सत्रांमध्ये घेतली जाईल. परीक्षेतील दोन्ही प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ वहुपर्यायी स्वरूपाच्या असतील. उमेदवारांना दोन्ही प्रश्नपत्रिकांसाठी तीन तासांचा अवधी दिला जाईल.



## यूपीएससीचे पुढील वर्षीच्या स्पर्धा परीक्षांचे वेळापत्रक

**केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे २०२५ मध्ये होणाऱ्या विविध भरती परीक्षांचे वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे. त्यामुळे आता यूपीएससीच्या परीक्षांची तयारी करणाऱ्या उमेदवारांना वेळापत्रकानुसार अभ्यास करता येणार आहे.**

यूपीएससीने परीक्षा दिनदर्शिकद्वारे नागरी सेवा परीक्षा, एनडीए, सीडीए, वनसेवा, भूशास्त्र अशा विविध परीक्षांच्या तारखा, परीक्षांची नोंदणी, याबाबतची माहिती जाहीर केली आहे. या परीक्षेच्या वेळापत्रकानुसार २२ जानेवारी ते ११ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत नागरी सेवा परीक्षा २०२५, भारतीय वनसेवा परीक्षा २०२५ म्हणजेच यूपीएससी पूर्वपरीक्षा २०२५ ची एकत्रित नोंदणी करता येईल. ही परीक्षा २५ मे रोजी होणार आहे. नागरी सेवा पूर्वपरीक्षेतील यशस्वी उमेदवारांसाठी २२ ऑगस्टपासून नागरी सेवा मुख्य परीक्षा २०२५ आयोजित केली जाणार आहे. राष्ट्रीय संरक्षण



प्रबोधिनी आणि नौदल अकादमी (एनडीए-एनए) परीक्षा २०२५ आणि सामाईक संरक्षण सेवा (सीडीएस) परीक्षा २०२५ साठीची नोंदणी ११ ते ३१ डिसेंबर २०२४ दरम्यान करता येणार आहे. त्यानंतर नोंदणीकृत उमेदवारांची परीक्षा १३ एप्रिल २०२५ रोजी होणार आहे. ९ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या अभियांत्रिकी सेवा पूर्वपरीक्षा २०२५ साठीची नोंदणी प्रक्रिया १८ सप्टेंबर ते ८ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत नोंदणी करता येणार आहे. ९ फेब्रुवारीला संयुक्त भू- वैज्ञानिक पूर्वपरीक्षा २०२५ होणार आहे. त्यासाठी ४ सप्टेंबर ते २४ सप्टेंबर २०२४ या कालावधीत नोंदणी करता येणार आहे.

## परदेशी विद्यार्थ्यांसाठी मुक्तची दारे बंद


परदेशी विद्यार्थ्यांना मुक्त आणि दूरस्थ अभ्यासक्रमांना प्रवेश न देण्याचा आदेश विद्यापीठ अनुदान आयोग अर्थात यूजीसीने देशभरातील उच्च शिक्षण संस्थांना दिले. यूजीसीच्या नियमावलीनुसार भारतात राहणारेच मुक्त आणि दूरस्थ अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी पात्र असल्याचे यूजीसीने स्पष्ट केले आहे.

यूजीसीच्या मुक्त आणि दूरस्थ, ऑनलाइन अभ्यासक्रम नियमावली २०२० मध्ये प्रवेश पात्रता नमूद करण्यात आली आहे. देशातील कोणत्याही भागात राहणारा विद्यार्थी यूजीसीच्या मान्यताप्राप्त उच्च शिक्षण संस्थेतील मुक्त आणि दूरस्थ अभ्यासक्रमांतर्गत कोणत्याही अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ शकतो. विद्यार्थी संस्थेतील प्रादेशिक कार्यक्षेत्रातील असणे आवश्यक असल्याचे या नियमावलीत नमूद केले आहे. तसेच फ्रेंचाईज शिक्षण संस्थांतर्फे चालविले जाणारे ऑफ कॅम्पस, मुक्त विद्यापीठांच्या दूरस्थ अभ्यासक्रमांचे अभ्यास केंद्र, शैक्षणिक संस्थांचे प्रसार अभ्यासक्रम आणि नियामक मान्यतेशिवाय राबविले जाणारे अभ्यासक्रम, यासाठी विद्यार्थी व्हिसा दिला जाणार नसल्याचे केंद्रीय गृहमंत्रालयाने स्पष्ट केल्याचे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर मान्यताप्राप्त उच्च शिक्षण संस्थांनी मुक्त आणि दूरस्थ अभ्यासक्रमांसाठी कोणत्याही परदेशी विद्यार्थ्यांना प्रवेश देऊ नये. तसेच यूजीसी नियमावली २०२० नुसार भारतात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रादेशिक अधिकारक्षेत्राची पूर्तता करून मुक्त आणि दूरस्थ अभ्यासक्रमांना प्रवेश देता येईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

## फेक ऑनलाइन अभ्यासक्रमांचे जाळे

काही शैक्षणिक संस्थांकडून कमी कालावधीचे ऑनलाइन अभ्यासक्रम राबविण्यात येत आहेत. यात दहा दिवसांमध्ये एमबीए, बीबीए आदी अभ्यासक्रम शिकवण्यात येणार असल्याचे विद्यार्थ्यांना सांगण्यात येत आहे. परंतु, अशा फेक ऑनलाइन अभ्यासक्रमांपासून सावध राहा, असा इशारा विद्यापीठ अनुदान आयोग अर्थात यूजीसीने दिला आहे.

यूजीसीने दिलेल्या माहितीनुसार, काही शैक्षणिक संस्था दहा दिवसांचा एमबीए अभ्यासक्रम उपलब्ध करून देत असल्याचे निदर्शनास आले आहे. परंतु, असा क्रॅश कोर्स हा तरुणांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न आहे. यूजीसीच्या नियमांनुसार कोणताही ऑनलाइन पदवी कार्यक्रम ऑफर करण्यासाठी उच्च शिक्षण संस्थांना यूजीसीकडून मान्यता घेणे आवश्यक आहे. www.deh.ugc.ac.in या संकेतस्थळावर ऑनलाइन प्रोग्राम ऑफर करण्यासाठी मान्यताप्राप्त आणि परवानगी असलेल्या संस्थांची यादी उपलब्ध आहे. त्यामुळे कोणत्याही ऑनलाइन प्रोग्राममध्ये अर्ज करण्यापूर्वी किंवा प्रवेश घेण्यापूर्वी संबंधितांना ऑनलाइन प्रोग्रामची वैधता



पडताळून पाहण्याचा सल्ला यूजीसीने दिला आहे. एमबीए हा दोन वर्षांचा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम आहे. व्यवसाय आणि व्यवस्थापनाबाबत प्रगत माहिती आणि कौशल्य देण्याची रचना अभ्यासक्रमात करण्यात आली आहे. त्यामुळे एमबीए अभ्यासक्रम (पदवी असल्यास) दहा दिवसांत पूर्ण होऊ शकत नाही. त्यामुळे काही व्यक्ती, संस्थांकडून देण्यात येणारा एमबीए क्रॅश कोर्स चुकीचा आणि दिशाभूल करणारा असल्याची नोंद सर्व भागधारकांनी घ्यावी, विद्यार्थ्यांनी अशा फसवणुकीला बळी पडू नये, असेही यूजीसीकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

## आयसरमध्ये प्रवेश हवाय?

**भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्था अर्थात आयसरने प्रवेश प्रक्रियेत बदल केले आहेत. पदवी अभ्यासक्रमासाठी संयुक्त प्रवेश परीक्षेचे गुण ग्राह्य धरले जात होते. परंतु, या वर्षापासून आयसरचे प्रवेश हे केवळ आयसर ॲप्टिट्यूड टेस्टद्वारे होणार आहेत. त्यामुळे जेईई मेन्स, जेईई ॲडव्हान्स किंवा केव्हीपीवाय आदी परीक्षांचे गुण ग्राह्य धरले जाणार नसल्याची माहिती आयसर कोलकाताच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष व ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अरविंद नातू यांनी दिली आहे.**

केंद्र सरकारच्या अखत्यारीत येणाऱ्या आयसर शिक्षण संस्थेच्या पुण्यासह तिरुपती, भोपाळ, मोहाली, तिरुअनंतपुरम, कोलकाता, बेहरामपूर या सात ठिकाणी शैक्षणिक संकुले आहेत. विज्ञान आणि मानव्य विज्ञानातील पदवी, पदव्युत्तर, संशोधनातील चार वर्षांचा पदवी (बीएस) अभ्यासक्रम, पाच वर्षांचा पदव्युत्तर पदवी (बीएस-एमएस) हे अभ्यासक्रम येथे राबविले जातात. प्रवेश प्रक्रियेसंदर्भात डॉ. नातू म्हणाले, आतापर्यंत जेईई मेन्स, जेईई ॲडव्हान्स किंवा केव्हीपीवाय आदी परीक्षांचे गुण आयसरच्या प्रवेशासाठी ग्राह्य



धरले जात होते. परंतु, अलीकडील काळात संबंधित परीक्षांचे वेळापत्रक जुळत नसल्याने आयसरचे प्रवेश केवळ आयसर ॲप्टिट्यूड टेस्टद्वारे करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पहिल्यांदाच अशा पद्धतीने प्रवेश प्रक्रिया राबवली जाणार आहे. आयआयएससी बंगळुरूच्या प्रवेशासाठी किशोर वैज्ञानिक प्रोत्साहन योजनेतील (केव्हीपीवाय) गुणवंत विद्यार्थ्यांची निवड केली जात होती. परंतु, आता ही परीक्षा केंद्र सरकारने बंद केल्यामुळे आयसर संस्थेने तयार केलेल्या आयसर ॲप्टिट्यूड टेस्टद्वारे आयआयएससीच्या विद्यार्थ्यांची निवड करण्यात येत आहे. यातून आयसर ॲप्टिट्यूड टेस्टचा दर्जा उत्तम असल्याचे दिसून येत आहे. पुढील वर्षापासून आयसर, नायसर, आयआयएससी बंगळुरू आदींच्या प्रवेशासाठी एकच प्रवेश परीक्षा होण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

## हातमाग, वस्त्रोद्योग तंत्रविज्ञान पदविकेस अर्ज करण्याची संधी

हातमाग व वस्त्रोद्योग तंत्रविज्ञान पदविका या अभ्यासक्रमासाठी घेण्यात येणाऱ्या प्रवेश परीक्षेसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. त्यासाठी १० जून ही अंतिम मुदत देण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या अखत्यारीत येणारी भारतीय तंत्रविज्ञान बरगढ (ओडिशा) संस्था, येथील हातमाग व वस्त्रोद्योग तंत्रविज्ञान पदविका या तीनवर्षीय अभ्यासक्रमासाठी अर्ज स्वीकारण्यात येत असल्याची माहिती आयुक्त अविष्यांत पंडा यांनी दिली आहे.

महाराष्ट्र राज्यातून बरगढ (ओडिशा) संस्थेत प्रथम वर्षासाठी १३ जागा असून, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक १ जागेसाठी प्रवेश देण्यात येणार आहे. द्वितीय वर्षासाठी ३ जागा असून, त्यापैकी १ जागा आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी आरक्षित असणार आहे. वेंकटगिरी येथे २ जागांसाठी प्रवेश देण्यात येणार आहे. अर्ज करण्यासाठी आयुक्तालयाच्या www.dirtexmah. gov. in या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी लागणार आहे.

पात्र विद्यार्थ्यांचा हातमाग व वस्त्रोद्योग पदविका अभ्यासक्रमासाठी केलेला विहित नमुन्यातील अर्ज १० जूनपर्यंत स्वीकारण्यात येणार आहे. तसेच या अभ्यासक्रमासाठी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन प्रादेशिक उपायुक्त सीमा पांडे यांनी केले आहे. तसेच स्थानिक उमेदवारांसाठी अर्जाचा नमुना जुने सचिवालय येथील वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर येथे उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

## दूरस्थ, ऑनलाइन पद्धतीनेही शिका ट्रॅव्हल टुरिझम कोर्स



**देशभरातील राज्य, केंद्रीय आणि खासगी विद्यापीठांना व्यवस्थापन, संगणक उपयोजन आणि ट्रॅव्हल टुरिझम विषयातील पदवी, पदव्युत्तर आणि पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम दूरस्थ, ऑनलाइन पद्धतीने राबविण्याची मोकळीक मिळणार आहे. हे अभ्यासक्रम राबविण्यासाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची (एआयसीटीई) परवानगी, शिफारस घ्यावी लागणार नाही, असा निर्णय विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) घेतला.**

यूजीसी (दूरस्थ अभ्यासक्रम आणि ऑनलाइन अभ्यासक्रम) नियमावली २०२० नुसार दूरस्थ आणि ऑनलाइन अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी यूजीसीकडे अर्ज करण्यापूर्वी संबंधित नियामक संस्थेची मान्यता, शिफारस घेणे बंधनकारक आहे. परंतु, एआयसीटीईच्या पत्रानुसार सर्वोच्च न्यायालयाने भारथीदासन विद्यापीठ आणि अन्य विरुद्ध अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद आणि इतर (२००१) ८ एससीसी ६७६ या प्रकरणात दिलेल्या निर्णयानुसार राज्य, केंद्रीय आणि खासगी विद्यापीठांनी तंत्रशिक्षण अभ्यासक्रम राबविण्यासाठी एआयसीटीईची परवानगी घेणे बंधनकारक नाही. याबाबत सविस्तर चर्चा केल्यानंतर केंद्रीय, राज्य आणि खासगी विद्यापीठांना यूजीसी (दूरस्थ अभ्यासक्रम आणि ऑनलाइन अभ्यासक्रम) नियमावली २०२० नुसार दूरस्थ, ऑनलाइन अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी एआयसीटीईचे ना-हरकत पत्र, मान्यता, शिफारस घेण्याची गरज नाही, असा निर्णय यूजीसीने घेतल्याचे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

### अभिमत विद्यापीठांना परवानगी आवश्यक

राज्य, केंद्रीय आणि खासगी विद्यापीठांना मोकळीक मिळाली असली, तरी अभिमत विद्यापीठांची नियमातून सुटका झालेली नाही. दूरस्थ आणि ऑनलाइन अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी यूजीसीकडे अर्ज करण्यापूर्वी अभिमत विद्यापीठांना एआयसीटीईची मान्यता, ना हरकत पत्र, शिफारस घेणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

## शॉर्ट न्यूज

### विकास कामांना नगरकरांचा पाठिंबा

**नगर :** शहरामध्ये पक्षीय राजकारण बाजूला ठेवून विकास कामांना प्राधान्यक्रम देत नागरिकांचे एक-एक प्रश्न हाती घेऊन नियोजनबद्ध शहर विकासाची कामे मार्गी लावली आहे. त्यामुळे नगरकरांचा विकास कामांना पाठिंबा राहील. खा. डॉ. सुजय विखे पाटील यांनी शहरातील विकासाचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी मदत केली आहे. त्यामुळे विकास कामातून विकसित नगर निर्माण होत आहे नगर-पुणे रेल्वे सेवेचे काम मार्गी लावण्यासाठी खा. डॉ. सुजय विखे पाटील यांना पुन्हा एकदा संसदेमध्ये पाठवायचे आहे असे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी केले.

### बाजारात चोरट्यांचा सुमारे १० मोबाईलवर डल्ला

**नेवासा :** तालुक्यातील पाचेगाव बाजारातून सुमारे १० मोबाईल चोरीस गेल्याची घटना घडली आहे. याबाबत माहिती अशी की, तालुक्यात मोठा बाजार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पाचेगावच्या बाजारात व्यापारी वर्ग देखील मोठ्या प्रमाणात येत असतो. सध्या मे महिन्याच्या उन्हाच्या तीव्र झळा जाणवत असल्याने बाजार चक्क चार नंतर भरतो. त्यामुळे चार नंतर गावातील व शेजारच्या गावातील देखील ग्रामस्थ व महिला बाजारासाठी गर्दी करतात. याचाच फायदा घेत चोरट्यांनी महागडा मोबाईल चोरून चोरटे पसार झाले आहेत.

### श्रीरामपुरात ५ लाखांसाठी विवाहितेचा छळ

**श्रीरामपूर :** व्यवसाय टाकण्यासाठी माहेरून ५ लाख रुपये आणावेत म्हणून श्रीरामपुरात विवाहितेचा शारिरीक, मानसिक छळ करण्याचा प्रकार घडला आहे. याबाबत, कोमल प्रणव बंड (रा. चोथाणी - हॉस्पीटल जवळ, वॉर्ड नं. ७) या विवाहितेने दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी पती प्रणव अशोक बंड, सासू कुंदा अशोक बंड, सासरा अशोक गोपीनाथ बंड, दीर बंड्या उर्फ ऋषिकेश अशोक बंड, जाव सुनीता ऋषिकेश बंड (सर्व रा. चोथाणी हॉस्पीटलजवळ, वॉर्ड नं. ७, श्रीरामपूर) यांच्याविरूद्ध भा. दं. वि. कलम ३२३, ३४, ४९८अ, ५०४, ५०६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### राजकारणात समाजमन जपणारी माणसे गरजेची

**श्रीगोंदा :** राजकारण समाजकारणात समाजाचे भान जपणारी माणसे गरजेची असल्याचे मत डॉ. अमोल कोल्हे यांनी व्यक्त केले आहे. नीलेश लंके यांच्या प्रचारार्थ बेलवंडी येथे आयोजित करण्यात आलेल्या प्रचार सभेत डॉ. कोल्हे हे बोलत होते. माजी आमदार राहुल जगताप, जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके, घनश्याम शेलार, बाबासाहेब भोस, सुनंदा पाचपुते, सुनील गव्हाणे, राजेंद्र आघाव, शिवसेनेच उपजिल्हा प्रमुख संदेश कार्ले, बाळासाहेब हराळ, हरिदास शिर्के, प्रशांत दरेकर, अनिल कोकाटे, स्मितल वाबळे, मनोहर पोटे यांच्यासह मोठा जनसमुदाय यावेळी उपस्थित होता.

### आ. थोरातांच्या प्रचार यंत्रणेमुळे वाकचौरे घराघरात

**संगमनेर :** लोकसभा निवडणुक ही लोकशाही व संविधान वाचवण्यासाठी असून काँग्रेस पक्षाचे नेते आमदार बाळासाहेब थोरात ही महाविकास आघाडीच्या वतीने राज्यभर प्रचाराची धुरा सांभाळत आहे. तर त्यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर तालुक्यात ग्रामीण व शहरी भागात कार्यकर्त्यांनी घराघरापर्यंत जाऊन अत्यंत काटेकोरपणे प्रचाराचे नियोजन राबवले आहे. संगमनेर तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये युवक नेत्या कॅन्सर तज्ञ डॉ. जयश्री थोरात व इंद्रजीत थोरात यांनी प्रचाराचा धडाका कायम ठेवला आहे.

# तरुण मराठा भावाला विजयी करण्यासाठी आले!

## पंकजा मुंडे यांची पाथर्डीत भावनिक साद

**पाथर्डी : प्रतिनिधी**

**गोपीनाथ मुंडेची लेक एका तरूण मराठा भावाला विजयी करण्यासाठी आली असल्याची भावनिक साद पंकजा मुंडे यांनी घातली. सुजय विखे पाटील यांना विजयी करण्यासाठी एक एक मत महत्वाचे असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री पंकजा मुंडे यांनी केले. पाथर्डी येथे आयोजित केलेल्या प्रचार सभेत त्या बोलत होत्या.**




महायुतीचे उमेदवार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या प्रचारार्थ पाथर्डी येथील बाजार तळ मैदान येथे महासभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी खासदार धैर्यशील माने, उमेदवार डॉ. सुजय विखे पाटील यांच्यासह जिल्हा बँकेचे चेअरमन शिवाजीराव कर्डिले, आमदार मोनिकाताई राजळे, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, अशोक चोरमले, बापूसाहेब भोसले, मृत्यूंजय गर्जे, तुषार वैद्य, राहुल राजळे, काशिनाथ लवांडे, देविदास खेडकर, बाळासाहेब दराडे, भगवान बांगर, अंकुश चितळे, अशोक अहुजा आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

त्यांनी सांगितले की, डॉ. सुजय विखे यांनी आपल्या पहिल्याच खासदारकीच्या काळात विविध विकासकामे करत आपली चुणूक दाखवली आहे. यामुळे येणाऱ्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्याचा विकास करण्याची त्यांना दुसऱ्यांचा संधी देण्याची आपली जबाबदारी आहे. यामुळे एक एक मत महत्वाचे असून त्या मतामुळे नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा देशाची धुरा सांभाळणार आहेत. यामुळे येत्या १३ मे रोजी कमळाचे बटन दाबून त्यांना प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी माजी. जिल्हापरिषद अध्यक्षा शालिनीताई यांनी सुध्दा कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

त्यांनी सांगितले की, खा. डॉ.सुजय विखे यांना करोनामुळे कमी कार्यकाल मिळाला पण त्यातही त्यांनी जिल्ह्यात ४ औद्योगिक वसाहती आणल्या. यामुळे जिल्ह्यातील तरुणांना जिल्ह्यातच काम मिळणार आहे.

तर शिवाजीराव कर्डिले यांनी आपल्या भाषणात खा. डॉ. सुजय विखे यांच्या कार्याचा गौरव केला. तर आमदार मोनिकाताई यांनी जिल्ह्यातील विविध प्रश्न मांडून त्यांचे समाधान सोडविण्यासाठी सुजय विखे हेच पर्याय असल्याचे सांगितले. तर खासदार धैर्यशील माने यांनी संसदेतील सुजय विखे यांच्या कामाचा गौरव करत मोदींच्या टीम मध्ये डॉ. सुजय विखे यांना पाठविण्याचे आवाहन केले.

# आईवडिलांचा अपमान सहन करणार नाही

## देशात सध्या अघोषित हुकूमशाही उद्धव ठाकरे यांचा हल्लाबोल

**श्रीरामपूर : प्रतिनिधी**

**सध्या देशामध्ये अघोषित हुकूमशाही सुरू आहे. तिला हातामध्ये मशाल घेऊन जाळून टाकण्याची वेळ आली आहे. शेतकऱ्यांनी आपल्या हक्कासाठी केलेले आंदोलन बळाचा वापर करून दडपण्याचा प्रयत्न सुरू आहे. कोणत्याही शेतमालाला भाव नाही, विशेषत: महाराष्ट्रातील शेतकऱ्याची आवस्था बिकट झाली आहे. निर्यात बंदी आणून कांद्याचे भाव पाडले गेले. त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांचे सुमारे अकरा हजार कोटींचे नुकसान झाले. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या आहेत, अशी टीका शिवसेना प्रमुख उध्दव ठाकरे यांनी केली.**



श्रीरामपूर येथील थत्ते मैदान येथे आयोजित महाविकास आघाडीच्या प्रचार सभेत ते बोलत होते. याप्रसंगी आमदार बाळासाहेब थोरात, आमदार लहु कानडे, आमदार शंकरराव गडाख, आमदार नितीन देशमुख, भाऊसाहेब वाकचौरे, आदी उपस्थित होते.

उध्दव ठाकरे पुढे म्हणाले, आगामी लोकसभा निवडणुकीनंतर इंडिया आघाडीचे सरकार आल्यास शेतीच्या खतावरील जीएसटी रद्द करून, शेतमालाला हमीभाव देणार असल्याची ग्वाही शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांनी दिली. कोरोना काळामध्ये खऱ्या अर्थाने देश वाचविला असेल, तर तो येथील शेतकऱ्यांनी. सर्व देशाला अन्नधान्य पुरवण्याचे काम या अन्नदात्याने केले आणि आता त्याचीच अवस्था मोदी सरकारने बिकट करून टाकली आहे. त्याला देशोधडीला लावले आहे. हे पाप मोदी सरकाने केले आहे. त्यामुळे त्यांना धडा शिकविण्याची वेळ आली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केलेले संविधान ते बदलायला निघाले आहेत, असे ते म्हणाले.

# पाच वर्षांसाठी अभिनय क्षेत्रातून ब्रेक घेणार !

## खासदार अमोल कोल्हे यांची मोठी घोषणा मतदारसंघाचे प्रश्न सोडवणे हेच माझे प्राधान्य

**शिरूर : प्रतिनिधी**

**ऐन निवडणूक काळात शिरुरमधील महाविकास आघाडीचे उमेदवार अमोल कोल्हे यांनी मोठी घोषणा केली आहे. त्यांनी ५ वर्षांसाठी अभिनय क्षेत्रातून ब्रेक घेणार असल्याचे जाहीर केले आहे. राजकारण हा पार्टटाईम व्यवसाय नसून फुल टाईम सेवा करण्याचे क्षेत्र असल्याचे अमोल कोल्हे यांनी म्हंटले आहे. त्यांच्या या निर्णयामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.**



**मतदारसंघाचे प्रश्न सोडवण्याला प्राधान्य**

अमोल कोल्हे म्हणाले, मतदारसंघातील प्रश्न सोडवायचे असतील तर मला पूर्णवेळ काम करावे लागणार आहे. अभिनय क्षेत्राला ब्रेक जरी घेतला तरी आत्ता शिरुर लोकसभा मतदारसंघाचे प्रश्न सोडवणे यालाच माझे प्राधान्य आहे. त्यामुळे, अभिनय क्षेत्रासाठी ब्रेक घ्यावा लागला तरी माझी काहीच हरकत नाही. गेल्या पंधरा वर्षांत मतदारसंघात प्रकल्प आले नाहीत. मात्र गेल्या पाच वर्षांत अनेक प्रकल्प आले, असे अमोल कोल्हे म्हणाले.

**निर्णयामुळे चाहत्यांची निराशा होऊ शकते**

पुढे अमोल कोल्हे म्हणाले, माझ्या या निर्णयामुळे चाहत्यांची निराशा होऊ शकते. मात्र शिरूरमधील जनतेने माझ्यावर विश्वास दाखवायचे ठरवले आहे. मालिका विश्वात काम करत असताना पूर्ण वेळ देणे शक्य होत नाही. त्यामुळे पुढील पाच वर्षांसाठी मी अभिनय क्षेत्रातून ब्रेक घेण्याचा निर्णय घेतला आहे, असे अमोल कोल्हेंनी स्पष्ट केले.

तसेच छत्रपती संभाजी महाराज व छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार लोकांपर्यंत पोहोचवणे एवढाच अपवाद राहिल, त्यामुळे या व्यतिरिक्त मी तुम्हाला स्क्रीनवर दिसणार नाही असे अमोल कोल्हे म्हणाले. काही दिवसांपूर्वीच एका अभिनेत्याला लोकसभा मतदारसघाचे किंवा जनतेचे प्रश्न काय समजणार, असे म्हणत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अमोल कोल्हेंना लक्ष केले होते. मात्र, आता अमोल कोल्हेंनी या सर्व टीकाकारांना आपल्या निर्णयाने गप्प केले आहे.

**कोल्हे आणि आढळराव पाटील आमनेसामने**

दरम्यान, शिरूर लोकसभेतून महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे विद्यमान खासदार अमोल कोल्हे यांना पुन्हा निवडणुकीच्या रिंगणात उतरविण्यात आले आहे. तर महायुतीकडून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटातर्फे शिवाजीराव आढळराव पाटलांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यामुळे आता पुन्हा २०१९ प्रमाणेच अमोल कोल्हे विरुद्ध आढळराव पाटील असा सामना रंगणार आहे.

# मतपेट्या वाहतुकीसाठी ४३० एसटी बसेस

**नगर : प्रतिनिधी**

**नगर, शिर्डी मतदारसंघातील लोकसभा निवडणुकीसाठी १३ मे रोजी मतदान होणार आहे. त्यासाठी जिल्ह्यात मतपेट्या वाहतुकीसाठी दोन दिवस ४३० एसटी बसेस तैनात करण्यात आल्या आहे.**



सध्या नगर, शिर्डी लोकसभा निवडणुकीत प्रचाराचा धडाका सुरू आहे. १३ मे रोजी मतदान पार पडणार असल्याने प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे.

नगर शिर्डी या मतदारसंघात मतपेट्या वाहून नेण्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळाच्या नगर विभागाच्या विविध आगारातून ४३० बसेस दिल्या जाणार आहेत. जिल्हा प्रशासनाकडून एसटी प्रशासनाकडे ही मागणी करण्यात आली होती. या निवडणुकीचा भार प्रवाशांना सहन करावा लागणार आहे.









# पारनेरची पाणी योजना प्रशासकीय मंजूरी स्तरावर

## ■ नगरपंचायतीने ७३ लाखांची रक्कमही जमा केली ■ विरोधकांकडून दिशाभूल केली जात असल्याचा आरोप

**पारनेर : प्रतिनिधी**

**पारनेर शहरास मुबलक पाणी पुरवठा करण्यासाठी आ. नीलेश लंके यांच्या प्रयत्नांतून मुळा धरणातून पाणी योजनेचा प्रस्ताव शासनदरबारी सादर करण्यात आला असून या योजनेस केवळ प्रशासकीय मंजुरी मिळणे बाकी आहे. या योजनेसाठीची ७२ लाख ८७ हजार २७७ रूपये इतकी रक्कमही शासनाकडे जमा करण्यात आली असल्याचे पारनेर शहर महाविकास आघाडीच्या वतीने सांगण्यात आले.**

लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभुमीवर विरोधक पाणी योजनेचे भांडवल करीत असून पारनेरच्या योजनेसोबत सादर करण्यात आलेले प्रस्ताव मंजुर करण्यात आलेले असताना पारनेरच्या पाणी योजनेमध्ये कोणी खोडा आणला हे प्रथम विरोधकांनी पारनेर शहराच्या जनतेला सांगावे. स्वतः काही काम करायचे नाही व इतरांनी केलेल्या कामात खोडा घालून स्वतःचा नाकर्तेपणा झाकण्याचा विरोधकांचा नेहमीचाच धंदा आहे. इतरांनी केलेल्या कामाचे श्रेय घेणे, आ. नीलेश लंके यांनी मंजुर केलेल्या कामास अधिकाऱ्यांवर दबाव आणून स्थगिती देण्यास भाग पाडणे याची पारनेर तालुक्यातील जनतेला जाणीव आहे. लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभुमीवर पारनेर-नगर मतदारसंघातील ३५० कोटी रूपयांच्या कामांना स्थगिती देण्याचे पाप कोणी केले याचेही उत्तर विरोधकांनी पारनेर-नगर मतदारसंघातील नागरीकांना देण्याचे आवाहन महाविकास आघाडीच्या वतीने करण्यात आले.



### विरोधकांनी पाच वर्षात किती निधी आणला ?

**पाच वर्षात एक रुपयांचा निधी न आणणारे विरोधक आज कोणत्या तोंडाने मते मागत आहेत ? आम्ही मंजूर केलेल्या कामांमध्ये खोडा घालाने हेच एकमेव काम त्यांनी केले. पारनेर शहराची ही अवस्था तीच तालुक्याची. तरीही आ. लंके यांना तालुक्यात रोखण्याची दिवा स्वप्ने विरोधक पाहत आहेत, ही हास्यास्पद बाब असल्याचा टोला महविकास आघाडीकडून लगवण्यात आला.**

नीलेश लंके यांच्या माध्यमातून पारनेर शहरात खडा वस्ती रस्ता ३० लाख, बुगेवाडी तलाव दुरूस्ती १७ लाख, सोंडवस्ती रस्ता २० लाख, चत्तर मळा रस्ता २५ लाख, महाराज बाग रस्ता २० लाख, बुगेवाडी ट्रान्सफॉर्मर व पोल ९ लाख ५० हजार, बुगेवाडी शाळा शौचालय ९ लाख ९७ हजार, औटी वाडा रस्ता ८ लाख ३४ हजार, बाळू शेटे रस्ता २६ लाख ४६ हजार, ठोंबरे वस्ती रस्ता ३२ लाख, महाजन मळा रस्ता २५ लाख, शेरकर वस्ती रस्ता ४० लाख, मधुकर औटी रस्ता ५५ लाख, पाटाडी वस्ती रस्ता ४५ लाख, कान्हूर रस्ता ते संतोष घोडके घर रस्ता २५ लाख, घोडके तलाव रस्ता ४० लाख, संभाजी औटी घर रस्ता ५ लाख.

राजू चेडे रस्ता ६ लाख ८० हजार, अर्जुन पुजारी रस्ता ७ लाख १५ हजार, चेडे वस्ती रस्ता १२ लाख, वसंत चेडे रस्ता ७ लाख ५० हजार, जगन्नाथ ढवळे रस्ता पेव्हर ३ लाख, सेनापती बापट मचर्क्ष पेव्हर ३ लाख, शांताराम कावरे रस्ता ६ लाख ३५ हजार, कावरे वस्ती रस्ता ५८ लाख, हांडे वस्ती रस्ता १५ लाख, अप्पा चौक रस्ता १४ लाख, सिकंदर शेख वरची वेस बंदीस्त गटार ७ लाख, सुलाबाई शेलार रस्ता २ लाख, लमानबाबा रस्ता ६० लाख, समर्थनगर भुयारी गटार २३ लाख, प्रभाग ९ भुयारी गटार २३ लाख, विघ्नहर्ता सोसायटी गटार १२ लाख ६७ हजार.

बर्वे मेजर रस्ता ११ लाख ५० हजार, तुकाई माता रस्ता ३० लाख, कुंभारदरा रस्ता ३० लाख, कुंभारवाडी पाझर तलाव दुरूस्ती ६६ लाख, जि प शाळा सोबलेवाडी भिंत १५ लाख, इधाटे वस्ती रस्ता ४५ लाख, नागेश्वर मंदीर सभा मंडप २२ लाख, प्रभाग १२ मध्ये भुयारी गटार ५ लाख, प्रभाग १२ मध्ये अंतर्गत रस्ते व व्यायाम शाळा ३५ लाख, चर्च रस्ता २५ लाख, गरूडपक्षी घर रस्ता ४२ लाख, सुभाष नगरे रस्ता ११ लाख ७० हजार, गोरख धोत्रे रस्ता ५ लाख, कचरा डेपो शेड ६५ लाख, वॉचमेन केबिन १३ लाख, कचरा डेपो ट्रान्सफॉर्मर २४ लाख.

# मोदींना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी महायुतीच्या उमेदवाला मतदान करा

## सराफ फेडरेशनचे उपाध्यक्ष सुभाष मुथा यांचे आवाहन

**नगर : प्रतिनिधी**



**जैन समाजाला मदत करणाऱ्या नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी महायुतीच्या उमेदवाला १३ मे रोजी मतदान करा असे आवाहन जैन मंदिराचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य सराफ सुवर्णकार फेडरेशनचे उपाध्यक्ष सुभाष मुथा यांनी केले आहे. माध्यमांशी बोलताना त्यांनी सांगितले की, सकल जैन समाज, राजस्थानी समाज, व्यापाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे मतदानाचा अधिकार बजावत लोकशाहीचा उत्सव साजरा करावा.**

देशात सध्या लोकशाहीच्या लोकसभा निवडणुकीचा महाउत्सव सुरू आहे. लोकसभेची निवडणूक ही गल्ली बोळातील निवडणूक नसून देशाचा नेता ठरवणारी निवडणूक आहे. मागील १० वर्षात देशाचे नेते पंतप्रधान मोदी यांच्या काळात देशाला जगात प्रतिष्ठा मिळाली. तसेच देशातील प्रत्येक घटकाचा विकास करून त्यांनी नवा भारत निर्माण केला. व्यापाऱ्यांना आतापर्यंत विकासाच्या सर्वाधिक संधी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उपलब्ध केल्या यामुळे देशात अनेक तरूण व्यापारी निर्माण झाले. त्यांच्या इतका प्रभावी नेता देशात नाही. यामुळे देशाला अधिक मजबूत करण्यासाठी देशाची धुरा त्यांच्या हाती देणे गरजेचे आहे. त्यासाठी भाजप आणि महायुतीच्या उमेदवाला निवडून देणे ही आपली जबाबदारी असल्याचे मुथा यांनी सांगितले.

नगर लोकसभा मतदारसंघात भाजपचे उमेदवार खा.डॉ. सुजय विखे पाटील आहेत. ते उच्च शिक्षित आणि विकासाचे व्हिजन असणारे आहेत. त्यांच्या मार्फत नरेंद्र मोदी यांना आपल्याला पंतप्रधान करता येणार आहे. यामुळे सकल जैन समाज, राजस्थानी समाज तसेच नगरमधील व्यापारी वर्गाने देशहित, समाजहित लक्षात घेता सोमवार दि.१३ मे रोजी आवर्जून मतदानाचा हक्क बजावत विकासासाठी भाजपला मतदान करावे असे सांगितले.

सुभाष मुथा म्हणाले की, नगर शहरात तसेच नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघात जैन समाज मोठ्या प्रमाणावर आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कारकीर्दित जैन समाजाला अल्पसंख्याक दर्जा मिळाल्याने जैन समाजासाठी अनेक सवलती मिळाल्या त्याचा लाभ जैन समाजातील युवा वर्गाला होत आहे.

देशातील काही पवित्र जैन तीर्थस्थळे गिळंकृत करण्याचा प्रयत्न काही समाजविघातक प्रवृत्तींनी चालवला आहे. त्याला पायबंद घालण्याची ताकद पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे आहे. ते निश्चितच आपल्या पवित्र जैन तीर्थस्थळांचा वारसा जतन करतील असा आत्मविश्वास त्यांनी व्यक्त केला.

पद्मभूषण जैनाचार्य परमपूज्य रत्नसुंदर सुरीश्वरजी महाराजा साहेब हे कोविडच्या सुरुवातीला मुंबईत होते. तेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दूरध्वनीवरून त्यांच्याशी संपर्क साधून गोचरी पाण्याची (अन्नपाण्याची) व्यवस्था नीट आहे का? वैद्यकीय सुविधांची काही कमतरता नाही ना ? याची आवर्जून आपुलकीने विचारपूस केली होती. अयोध्या येथे जैन तीर्थक्षेत्र(मंदिर) साठी मोक्याच्या ठिकाणी ५ एकर जागा व तीर्थक्षेत्र, मंदिर उभारणीसाठी निधीही पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दिली आहे. मुंबईतील किंग्ज सर्कल रेल्वे स्टेशनला जैन तीर्थंकर पार्श्वनाथ भगवान यांचे नाव देण्याचा निर्णयही पंतप्रधान मोदींनी घेतला. साधूसाध्वीजी जेव्हा पायी अनवाणी विहार करतात तेव्हा त्यांना अनेकदा त्रास होतो,

अपघात होतात. ही बाब लक्षात घेऊन भाजप सरकारने संपूर्ण देशभरात विहार करणाऱ्या साधूसाध्वीजींना पोलिस संरक्षण देण्याचे आदेश जारी केले. असे जैन समाजासाठी, जैन धर्मासाठी अनेक चांगले निर्णय मोदी सरकारच्या काळात झाले आहेत. अशी कामे यापूर्वी ६० वर्षाच्या काळात कोणत्याही इतर पक्षाच्या सरकारने केली नव्हती.

भाजप सरकारनेच केंद्रात जैन समाजाच्या खासदाराला मंत्रीपद देवून समाजाला न्याय दिला होता. त्यामुळे सध्या नरेंद्र मोदी यांच्याशिवाय देशाला अन्य पर्याय नाही.त्यामुळे मतदानाच्या दिवशी सकाळीच सगळ्यांनीच आपल्या कुटुंबियांसह लवकर मतदानाचा हक्क बजावावा. नंतरच दुकाने उघडण्यासाठी जावे. आपले मतदानाचे कर्तव्य बजावून नंतर उद्योग, व्यवसायाकडे वळावे असे आवाहन सुभाष मुथा यांनी केले.

# त्या मारहाणीशी लंके यांचा संबंध नाही

## ■ संजय चंद्रे, आदीनाथ चंद्रे यांचे स्पष्टीकरण ■ विखे यांच्यावर बुमरँग उलटले

**नगर : प्रतिनिधी**





**सावेडी येथील संजय चंद्रे यांना अज्ञात व्यक्तींनी मारहाण केल्यानंतर लोकसभा निवडणूकीतील उमेदवार सुजय विखे यांनी या घटनेचा संबंध जोडून महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांना बदमान करण्याचा केलेला प्रयत्न त्यांच्यावरच उलटला आहे. संजय चंद्रे व त्यांचा मुलगा आदिनाथ यांनी याप्रकरणी स्पष्टीकरण दिले असून या घटनेशी लंके यांचा काहीही संबंध नसून या घटनेचे राजकीय भांडवल करण्यात येत असल्याचा खुलासा केला आहे.**

विखे गटाचा राजकीय डाव उधळला गेला असून त्यांचे कर्मचारीही तोंडघशी पडले आहेत. संजय चंद्रे या नागरिकास अज्ञातांकडून मारहाण करण्यात आली. त्यासंदर्भात डॉ. सुजय विखे यांचे माध्यम समन्वयक रामदास पाटील यांनी व्हिडीओ आणि प्रेस नोट माध्यम प्रतिनिधींकडे पाठविली. यापूर्वीही हिंदू मुस्लिम तेढ करणाऱ्या प्रेस नोट पाटील यांनी पाठविल्या होत्या. चंद्रे यांना विखे गटाच्या कार्यकर्त्यांनीच मारहाण केली असावी व त्याच अवस्थेत त्यांना लंके यांचे नाव घेण्यास प्रवृत्त केले असावे असा कयास लावण्यात येत आहे.

निवडणूक प्रक्रियेत सरळ मार्गाने आपण टिकू शकत नाही, जनाधार उरला नसल्याच्या भितीपोटी विखे कुटूंबिय हतबल झाले आहे. मोदींपासून केंद्र व राज्यातील मुख्यमंत्री, मंत्रयांना आमंत्रीत करूनही नीलेश लंके यांचा वाढता जनाधार कमी होत नसल्याने विखे गटाने रडीचा डाव खेळत लंके गटाकडून मारहाण झाल्याचा केविलवाणा प्रयत्न केला. असे अनेक प्रयत्न झाले असून प्रत्येक वेळी विखे यांच्या यंत्रणेस तोंडघशी पाडण्यात लंके गट यशस्वी ठरत आहे.

### घाबरल्यामुळे लंके यांचे नाव घेतले

**काल माझ्यावर जो भ्याड हल्ला झाला त्यावेळी हल्लेखोरांनी लंके साहेबांचे नाव घेतले. लंके किंवा इतर कोणत्याही उमेदवाराशी माझा वैयक्तीक विरोध नाही. हल्ला झाल्यामुळे घाबरलेल्या अवस्थेत मी लंके साहेबांचे नाव घेतले.**

**संजय चंद्रे**

### लंके यांच्याविषयी आदर

**माझ्या वडिलांवर जो हल्ला झाला त्यावेळी हल्लेखोराने नीलेश लंके यांचे नाव घेतले होते. त्यामुळे माध्यम प्रतिनिधींसमोर प्रतिक्रिया देताना वडिलांनी लंके यांचे नाव घेतले. त्यामागे त्यांचा कोणताही वयक्तीक हेतू नव्हता. लंके यांना आमचा कोणत्याही प्रकारचा विरोध नाही. आम्ही कोणत्याही राजकीय प्रक्रियेत सक्रीय नव्हतो व नाही. नीलेश लंके यांच्याविषयी आमच्या मनात आदर आहे. आमच्यावर कोणाचा दबाव नाही. मी वैयक्तीकरित्या हा व्हिडीओ प्रसारीत करीत आहे. काल जो व्हिडीओ व्हायरल झाला आहे त्याचे राजकीय भांडवल करण्यात आले आहे. अम्हाला मोठया प्रमाणावर फोन येत असून त्याचा अम्हाला मनस्ताप होतो आहे. पोलीस यंत्रणेकडून आम्हाला पाठबळ मिळण्याची गरज आहे. या घटनेची निष्पक्ष चौकशी होऊन खऱ्या आरोपींचा शोध घेतला गेला पाहिजे. नीलेश लंके यांच्यावर आरोप करण्यामागे आमचा कोणताही हेतू नव्हता.**

**आदीनाथ चंद्रे**

# सोनगांव येथे नीलेश लंके यांचा प्रचार फलक जाळला

## महाविकास आघाडी समर्थकांकडून कृत्याचा निषेध

**राहुरी : प्रतिनिधी**

**लोकसभा निवडणूकीमध्ये महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके व भाजपाचे उमेदवार खा. डॉ. सुजय विखे यांच्यात हाय होल्टेज लढत होत असताना राहुरी तालुक्यातील सोनगांव येथे नीलेश लंके यांचा प्रचार फलक जाळण्याची घटना समोर आल्याने महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये संतापाच व्यक्त करण्यात येत आहे.**

शुक्रवारी रात्री ही घटना घडल्यानंतर महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी घटनास्थळी जाऊन या घटनेचा निषेध व्यक्त केला. धानारे, सोनगांव, सात्रळ ग्रामस्थांच्या वतीने या घटनेचा जाहिर निषेध करण्यात येत आहे. ज्यांनी हे कृत्य केले त्यांच्यावर तात्काळ कारवाई करण्यात यावी. अशा प्रकारचे भ्याड हल्ले होणार असतील तर जशास तसे उत्तर देण्यास आम्ही समर्थ आहोत. कोणतेही संकट येवो, त्यास समोरे जाण्यास आम्ही तयार असल्याचा इशारा यावेळी देण्यात आला.



विरोधकांनी हे निच कृत्य केले आहे. समस्त धानोरे ग्रामस्थांच्या वतीने आम्ही या कृत्याचा निषेध करत आहोत. विरोधकांनी ही गोष्ट लक्षात घ्यावी की आम्ही जशास तसे उत्तर देऊ शकतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिकवणीचे आम्ही अनुकरण करतो. विरोधकांमध्ये धमक असेल तर त्यांनी समोर येउन लढावे. त्याच पध्दतीने आम्ही तुम्हाला उत्तर देऊ. विरोधकांनी पाठीत खंजीर खुपसण्याचे काम करू नये ही आमची विनंती आहे. ज्या गावच्या बोरी, त्याच गावच्या बाभळी आहेत. विरोधक रडीचा डाव खेळत असल्याच्या भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

यावेळी किरण पाटील कडू, सुर्यभान शिंदे, अमोल दिघे, सिताराम दिघे, कन्हैय्या दिघे, नरेंद्र आनाप, अजिम तांबोळी, पोपट दिघे, आदीनाथ दिघे, हर्षल कडू, जयराम दिघे, दानिश तांबोळी, अन्सार तांबोळी, अरूण दिघे, रमेश दिघे, दत्तात्रय पलघडम, कैलास पलघडम, संभाजी कडू, उदय कडू, सोमनाथ दिघे, संदीप वाकचौरे, सागर डुकरे तसेच समन्वयक जगदीश गागरे यावेळी उपस्थित होते.

# कुस्त्यांच्या जंगी आखाड्याने वडनेरच्या यात्रेची सांगता

## ग्रामसमृद्धी फाऊंडेशन आणि ग्रामस्थांचे आयोजन

**वडनेर बुद्रुक : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील वडनेर बुद्रुक गावातील मुक्ताबाई देवीच्या यात्रेची सांगता कुस्त्यांच्या जंगी आखाडाने झाली. कुस्ती स्पर्धेचे हे सातवे वर्ष असून नगर, पुणे, सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यातील शेकडो मल्लांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता.**



यात्राप्रेमींनी उत्साहाने सहभाग घेत यात्रेचा आनंद लुटला. दोन दिवसांच्या यात्रेत देवीस चोळीपातळ, नैवद्य, शेरणी, मांडव डहाळे, छबिना व पालखी मिरवणूक, बैलगाडे, लोकनाट्य तमाशा आणि कुस्त्यांच्या हगाम्याचे आयोजन केले गेले होते. नवीन बैलगाडा घाट आणि नवीन कुस्ती मैदानात स्पर्धांचे आयोजन केल्याने शौकिनांमध्येही आनंद आणि उत्साह पहायला मिळाला.

उत्कृष्ट नियोजन आणि मोठी बक्षिसे असल्याने वर्षानुवर्षे वडनेरचे कुस्तीचे मैदान प्रसिद्ध होत आहे आणि त्यामुळे पैलवान आणि कुस्तीप्रेमी या मैदानाला पसंती देत आहेत. दोन वर्षांपूर्वी नवीन कुस्ती मैदानाचा संकल्प यावेळी पूर्णत्वास आल्याचा आनंद असल्याचे फाऊंडेशनचे अध्यक्ष विकास वाजे यांनी सांगितले. यावेळी ग्रामसमृद्धी फाऊंडेशनचे सभासद, पंचक्रोशीतील कुस्तीप्रेमी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.स्पर्धेसाठी पंच म्हणून नवनाथ लामखडे, रोहित नऱ्हे, अरुण चौधरी यांनी काम पाहिले.

स्पर्धा यशस्वी होण्यासाठी विकास बबन वाजे, योगेश पांडुरंग पवार, महेश लक्ष्मण बोचरे ,सोपान भाऊसाहेब येवले, विक्रम सिताराम वाजे, गणेश भगवान येवले, अजित भाऊसाहेब वाजे, जितेंद्र बाळासाहेब बोचरे, किरण सुखदेव नऱ्हे, अरुण रेवजी चौधरी,निलेश शंकर बाबर,नवनाथ विठ्ठल नऱ्हे, गणेश मोहनलाल कटारिया, सुधीर पांडुरंग पवार,उत्तम हनुमंत बाबर, नवनाथ ज्ञानदेव बोऱ्हाडे, जयाताई नवनाथ बोऱ्हाडे, सुनील कचरू नऱ्हे, हरीष राणू नरवडे, लक्ष्मण सोनाजी गायकवाड, संदीप किसन येवले, शंकर खुपटे, नवनाथ दगडू नऱ्हे, गणेश भिकाजी जगदाळे, सहादू दत्तू येवले, सचिन पांडुरंग बाबर, योगेश अशोक चौधरी, राहुल मारुती नऱ्हे, राम अशोक वायदंडे, महेश केशव नऱ्हे,लहू किसन बोचरे, नवनाथ रतिलाल वाजे, गोरक्ष पोपट सुकाळे, दत्तात्रय राजाराम वाजे, विकास गेणभाऊ येवले, दत्तात्रय बाजीराव शेटे, गणेश रंगनाथ बाबर ,दत्ता मारुती सुकाळे, सागर पांडुरंग जगदाळे, ज्ञानदेव भाऊसाहेब येवले, दत्तात्रय गेणभाऊ येवले, अनिल विश्वनाथ जगदाळे ,ठकाराम बाळासाहेब थोरात, उत्तम निचित, सचिन रघुनाथ जगताप ,केतन संजय जगदाळे, दादाभाऊ बबन चौधरी, राहूल खंडेराव बाबर, किरण शांताराम चौधरी, लहू भाऊसाहेब शेटे आदींनी परिश्रम घेतले.

# सुपा परिसरात वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस

## ■ शेतकऱ्यांची उडाली धांदल उडाली ■ आंबा पिकाचे मोठे नुकसान



(छाया - शरद रसाळ, सुपा)

**सुपा : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील सुपा परिसरात काही भागात वादळी वार्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली. अचानक आलेल्या पावसामुळे शेतमालाची झाकपाक करताना शेतकऱ्यांची चांगलीच धांदल उडाली.**

शुक्रवारी सकाळपासून मोठ्या प्रमाणात उष्णता जाणवत होती. दुपारी दोन नंतर आकाशात ढगांची जमवाजमव चालू झाली दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास पारनेर तालुक्यातील बहुतांशी भागावर दाट ढगांनी गर्दी केली. लगेचच जोराचा वारा सुटला व विजांचा कडकडाटही जोरात होऊ लागला अखेर अडीच ते तीनच्या दरम्यान पारनेर शहर परिसर सुपा शहर परिसरात पावसाला सुरुवात झाली. पाऊस चालू असतानाही जोराचा वारा व विजांचा कडकडाट चालू होता. पावसाचे थेंब चांगले टपोरे असले तरी गारा दिसत नव्हत्या. थेंब मोठाले आसल्याने ताबडतोब जमिनीचा भुभाग ओला होऊन पाणी वहताना दिसु लागले.

अचानक आलेल्या वादळी वार्यासह पावसामुळे शेतकऱ्यांची चांगलीच त्रेधातिरपीट उडाली. सध्या अनेक ठिकाणी कांदा काढणे चालू असुन रानोमाळ व शेतात कांदा पडलेला आहे. अचानक आलेल्या पावसामुळे वादळ वाऱ्यात कांदा झाकपाक करताना शेतकऱ्यांची चांगलीच तारांबळ उडाली तर अनेक ठिकाणी जोराच्या वाऱ्यामुळे आंबा पिकाचे मोठे नुकसान झाले. जोराच्या वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी कैऱ्यांचा सडा पडलेला दिसत होता.

अवकाळी पावसामुळे शेतमालाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असले तरी तापमानाचा पारा थोडा खाली आलेला दिसत होता. मागील दोन तीन दिवसापासून पावसाचे वातावरण निर्माण होत आहे. गुरुवारी देखील काही भागात हलक्या सरी पडल्या.

# विखेंच्या धनशक्तीसमोर लंकेंची जनशक्ती भारी !

## ■ शिवसेनेचे आमदार भास्कर जाधव यांचा विश्वास ■ जामखेड येथे लंके यांच्या प्रचारार्थ सभा

**जामखेड : प्रतिनिधी**

**नगर लोकसभा मतदारसंघात भाजपा उमेदवार डॉ. सुजय विखे यांच्या धनशक्तीसमोर महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांची जनशक्ती भारी पडणार असून लंके हे खासदार म्हणून संसदेत जाणार असल्याचा विश्वास शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार भास्कर जाधव यांनी व्यक्त केला.**

महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्या प्रचारार्थ जामखेड येथे आयोजित करण्यात आलेल्या सभेमध्ये आ. जाधव हे बोलत होते. यावेळी बोलताना जाधव म्हणाले, नीलेश लंके यांचा विजय लोकशाही व संविधानाचा विजय असणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे विकासाचा मुद्दा नाही. म्हणून ते भावनिक मुद्दे पुढे करत आहेत. मोदी यांनी मागील दोन्ही निवडणूकांमध्ये जनतेला मोठी अश्वासने दिली होती. या आश्वासनांच्या स्वप्नात जनता होती. मात्र गेल्या दहा वर्षात जनतेच्या सर्व स्वप्नांचा चुराडा करीत देशाला महागाई, बेरोजगारीच्या खाईत लोटले असल्याचा हल्लाबोल जाधव यांनी केला.



■ महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्या प्रचारार्थ शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार भास्कर जाधव यांची जामखेड येथे सभा पार पडली.

जाधव म्हणाले, पुलवामा हल्ल्यात आपले ४२ जवान नाहक मारले गेले. देशावर शोककळा असतना पंतप्रधान चित्रीकरणात व्यस्त होते. आपणास भावनिक राजकारण करून त्यांनी देशाला दोनदा गंडविले आहे. आपले पक्ष फोडणारांना जनता कदापी माफ करणार नाही. मोदी सरकार चारसो पार नाही तर तडीपार होणार असल्याचा घणाघातही जाधव यांनी यावेळी केला.

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील म्हणाले, भाजपाने पवार कुटूंबियांना इडीच्या माध्यमातून त्रास दिला. त्यांनी आपल्यासोबत यावे म्हणून दबाव आणला गेला. परंतू रोहित पवार हे घाबरले नाहीत. त्यांनी या सर्व त्रासाचा सामना केला. जीएसटीच्या रूपाने भाजपाने सर्वसामान्य जनता, शेतकरी वर्गाचा खिसा कापला आहे. सगळयाच वस्तूंवर जीएसटी आकारण्यात येत असून भाजपाच्या काळात देश आराजकतेकडे चालला आहे. एकीकडे २५ लाख कोटी रूपयांचे उद्योगपतींचे कर्ज माफ केले जात असताना दुसरीकडे सर्वसामान्य जनतचे हाल होत असल्याची टीका पाटील यांनी केली.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com